MHKO120002862024

**नियमीत दिवाणी दावा क्र.६६/२०२४**

**नि. क्र.०५ वरील आदेश**

गुरूनाथ उर्फ गुरूप्रसाद मारुती रेडेकर

वि.

अभिजीत मारुती रेडेकर

दि.०२/०५/२०२६

1) प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम (१) व (२) अन्वये प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुद्ध तुर्तातुर्त ताकीद मिळावी याकरीता दिला आहे.

2) प्रस्तुतचा दावा वादींनी वाटपासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन –**

3) प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वादींनी असे कथन केले आहे की, मौ. खानापूर, ता. भुदरगड येथील गट क्र.७२२ मधील क्षेत्र ० हे. ०९ आर, गट क्र.३३६ मधील क्षेत्र ० हे २१ आर व गट क्र.३३८ मधील क्षेत्र ० हे. ३४ आर मधील क्षेत्र ही मिळकत इथून पुढे **'दावा मिळकत १(अ) ते १(क)'** म्हणून संबोधली आहे.

4) प्रस्तुतच्या अर्जामध्ये वादींनी असे कथन केले आहे की, दावा मिळकत १(अ) ही वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार मारुती यांनी नोंदणीकृत

खरेदी खत क्र.५६१/१९८६ दि.१४/११/१९८६ अन्वये खरेदी केले आहे. दावा मिळकत १(ब) व १(क) या दोन्ही मिळकती या वादीच्या वडिलार्जित मिळकती असून प्रतिवादी क्र.१ ने बेकायदेशीररित्या स्वतःच्या एकट्याच्या नावाने त्या करुन घेतलेल्या आहेत. वादी व प्रतिवादीचे पुर्वहक्कदार मारुती यांचे निधन झाले असून वादी व प्रतिवादी हे मारुती यांचे कायदेशीर व सरळ वारसदार आहेत. दावा मिळकत १(अ) मध्ये वादी व प्रतिवादीचा सामाईक अविभक्त हिस्सा होता व आहे.

5) वादीने दाव्यामध्ये पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी महसूल अधिका–यांशी संगणमत करुन खोटे कागदपत्रे बनवून मयताचे वारसांबाबत कोणत्याही स्थानिक प्रकारे चौकशी न करता दावा मिळकत १अ बाबतीत बेकायदेशीररितया फेरफार क्र.४०६७ हा दि.१६/०४/२०२४ रोजी मंजूर करुन घेतला आहे व त्याबाबत महसूल न्यायालयात वादींनी आक्षेप नोंदविला आहे. फेरफार क्र.४०६७ हा दावा मिळकत १अ बाबतीत झालेला आहे व त्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी हे दावा मिळकत तबदील करु पाहत आहेत अथवा त्यावर बोजा निर्माण करण्याची भाषा करत आहेत. तसेच दावा मिळकत १अ मध्ये असलेल्या घरामध्ये व उर्वरित जागेमध्ये देखील हरकत व अडथळा करु लागले आहेत. त्यामुळे वादीने दि.२७/०४/२०२४ रोजी

प्रतिवादी यांचेकडे सरसनिरस मानाने वाटप करुन मागितले असता प्रतिवादींनी स्पष्टपणे नकार दिल्याने दाव्यास कारण घडले. त्यामुळे दावा मिळकत १अ ते १क चे सरसनिरस मानाने वाटप व्हावे व संबंधित मिळकती या प्रतिवादी यांनी तबदील करु नये अथवा दावा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये, अशी निरंतर ताकीद मागितली आहे व प्रस्तुतच्या अर्जामध्ये देखील तशा स्वरुपाची तुर्तातुर्त ताकीद मागितली आहे.

6) प्रस्तुतच्या दाव्यास कैफियत व नि.क्र.५ च्या अर्जास म्हणणे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नि.क्र.२६ अन्वये दिले. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी असे कथन केले आहे की, दावा मिळकत १अ मध्ये (गट क्र.७२२ मध्ये) प्रतिवादी यांनी बांधलेली जुनी घरे आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र.२ हिने मारुती रेडेकर यांचे बरोबर लग्न झाल्यानंतर काही वर्षात बांधलेले घर आहे. वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आलेले नाहीत. वादीच्या आईचे नाव काय व प्रतिवादी क्र.२ चे लग्न मारुतीशी कधी झाले याचा खुलासा वादीने केलेला नाही. तसेच वादीच्या आईंने यापूर्वी पेन्शनबाबत हक्क सांगितला होता व त्याचा उल्लेख दाव्यामध्ये केलेला नाही.

7) प्रतिवादी क्र.१ व २ यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.२ चे पती मारुती हे पोलीस खात्यामध्ये नोकरीला होते व ते

कामावर असताना त्यांचा अपघाती मृत्यू सन १९८९ ला झाला व प्रतिवादी क्र.१ व ३ ही अपत्ये प्रतिवादी क्र.२ ला मयत मारुतीपासून झालेली आहेत. मारुती हे व्यसनी व चंचल प्रवृत्तीचे होते व त्यांनी रंजना या महिलेला रखेल म्हणून ठेवले होते व तिने यापूर्वी रे.क.नं.६३/१९८९ चा दावा दाखल केला होता व तो दावा दि.०८/११/१९९३ ला गुणदोषावर निकाली करण्यात आला व गट क्र.७२२ मध्ये असणारा ग्रामपंचायत मिळकत क्र.३३७ ही प्रतिवादी क्र.२ च्या कब्जेवहिवाटीमध्ये असणारी मिळकत आहे असा निष्कर्ष त्यावेळी न्यायालयाने काढला व सदर बाबीचा उल्लेख वादींनी दाव्यामध्ये केलेला नाही व सदरील महत्वाची बाब न्यायालयापासून लपविली आहे.

8) प्रतिवादी क्र.१ व २ यांनी पुढे असे कथन केले आहे की, मारुती यांनी प्रतिवादी क्र.२ शी विवाह केल्यानंतर काही कालावधीनंतर प्रतिवादी क्र.२ चे वडील सदाशिव किल्लेदार हे सधन असल्याने प्रतिवादी क्र.२ चे सासरी नेहमी जायचे. दावा मिळकत १(ब) व १(क) या जमिनीचे मालक चंदर रेडेकर यांचा हिस्सा होता व त्यांनी भवानी माता महिला नागरी पतसंस्था मर्या. या पतसंस्थेकडून रक्कम रु.४५,०००/- चे कर्ज घेतले होते व ते कर्ज थकित राहिले होते. संबंधित पतसंस्थेचे अधिकारी हे चंदर रेडेकर यांच्याकडे वसुलीचा तगादा लावत होते. त्यावेळी कर्ज भागविण्याचे चंदन रेडेकर यांनी

ठरविले व त्यांनी त्यांच्या मालकीच्या हिश्श्याची जमिन विक्री करण्याचे ठरविले. त्यावेळी प्रतिवादी क्र.१ च्या नावे खरेदी खत करण्यासाठी प्रतिवादी क्र. २ यांनी तिचे वडील सदाशिव किल्लेदार यांचेकडे पैसे मागण्याची विनंती केली व त्यावेळी त्या पैशातून चंदन रेडेकर यांनी दावा मिळकत १(ब), १(क) या जमिनी खरेदी केल्या व त्यावेळी रक्कम रु.४५,०००/– पतसंस्थेचे कर्ज देखील प्रतिवादींनी फेडले व अशा प्रकारे दि.२९/०६/२००६ रोजी प्रतिवादी क्र.१ च्या नावे दावा मिळकत १(ब), १(क) चे खरेदी खत झाले. वास्तविक, दावा मिळकत १(ब), १(क) या दोन्ही मिळकती या प्रतिवादी क्र.१ च्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत. सदर मिळकतमध्ये प्रतिवादी क्र.१ व २ हे पिके घेत असतात व संबंधित जमिनीच्या कब्जेवहिवाटीशी वादीचा कोणताही संबंध नाही.

9) प्रतिवादी क्र.१ व २ यांनी पुढे असे कथन केले आहे की, वास्तविक ग्रामपंचायत मिळकत क्र.३३७ प्रतिवादी क्र.१, २ यांचे घर आहे. उर्वरित जागेमध्ये लोखंडी शेड मारलेले आहे व मोटर दुरूस्तीसाठी ती जागा भाड्याने दिली आहे. दावा मिळकत १(अ) ही मारुती रेडेकर यांच्या नावावर होती व ती मिळकत प्रतिवादी क्र.१ ने त्यांचे नावावर लावणेबाबत अर्ज दिला व प्रतिवादी क्र.१ चे नावावर फेरफार क्र.४०६७ ने ती मिळकत प्रतिवादी

क्र.१ चे नावावर झाली. वादींनी त्यांच्या जनक आईचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादी क्र.१ व २ यांनी केली आहे. प्रतिवादी क्र.३(ब) यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी जी कैफियत नि.क्र.२० ला दिली आहे. तीच कैफियत व नि.क्र.५ चे म्हणणे समजण्यात यावे, अशी पुरशिस दिली आहे. प्रतिवादी क्र.३(अ) विरुद्ध नि.क्र.५ चालविण्याचा नाही, अशी पुरशिस नि.क्र.३९ अन्वये वादींना दिली आहे.

10) सदर दाव्याकामी खालील मुद्दे विचारार्थ येत आहेत व त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणांसह नोंदवत आहे.

| क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत करतो काय ? | **नकारार्थी** |
| २ | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे काय ? | **नकारार्थी** |
| ३. | वादीचा अर्ज नामंजूर झाल्यास त्याचे कशानेही न भरून येणारे नुकसान होईल, असे वादींना शाबीत केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**<u>कारणमिमांसा</u>**

11) दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

12) वादींतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र.२ सुशिला ही मयत मारुती यांची पहिली पत्नी आहे व प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.३ ज्योत्सना ही प्रतिवादी क्र.२ ला झालेली मारुती पासूनची अपत्ये आहेत व रंजना ही दुसरी पत्नी असून वादी हे रंजनापासून झालेली अपत्ये आहेत व वादी यांनी सर्व दावा मिळकतींमध्ये हिस्सा असल्याने जोपर्यंत वाटप होत नाही तोपर्यंत प्रत्येक मिळकतीवर प्रत्येक कुटूंबातील सहहिस्सेदाराचा हक्क आहे व कब्जा आहे, असेच म्हणावे लागेल व त्यामुळे सर्व दावा मिळकती विक्री करण्याचा अथवा त्यामध्ये हरकत अडथळा करण्याचा अधिकार प्रतिवादींना नाही. वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी केस आहे व न्यायाचा समतोल देखील वादींच्या बाजूने आहे. अर्ज नामंजूर केल्यास वादींचे कशानेही न भरून येणारे नुकसार होईल. त्यामुळे अर्ज मंजूर करावा, अशी विनंती त्यांनी केली आहे.

13) प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, वादी हे न्यायालयापुढे स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आलेले नाहीत. त्यांनी न्यायालयापासून महत्वाच्या बाबी लपविल्या आहेत. विशेषतः रंजना मारुती रेडेकर हिने प्रस्तुतच्या प्रतिवादी विरुद्ध ग्रामपंचायत मिळकत क्र.३३७ या मिळकतीबाबत रे.क्र.नं.६३/१९८९ हा निरंतर ताकीदीचा दावा दाखल केला होता व तो दावा गुणदोषावर निकाली करण्यात आला आहे, त्याचा उल्लेख प्रस्तुतच्या दाव्यामध्ये

केलेला नाही व त्या दाव्यामध्ये न्यायालयाने असे निष्कर्ष नोंदविले होते की, ग्रा.पं.मि.क्र.३३७ मध्ये प्रतिवादी क्र.२ सुशिला हिचा कब्जा आहे. त्यामुळे मनाईसारखी दाद वादी त्यांच्या लाभात मागू शकत नाहीत.

14) प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, वादी यांनी नातेसंबंधांचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. तसेच प्रतिवादी क्र.२ ने दावा मिळकत १(ब) व १(क) या दोन्ही मिळकती चंदर रेडेकर यांनी जे रक्कम रु.४५,०००/– चे कर्ज घेतले होते ते फेडण्याकरीता कायदेशीर गरजेकरीता त्यांनी पूर्वी जमिन प्रतिवादी क्र.१ ला विकली व त्यामुळे त्या दावा मिळकत १(ब) व १(क) या दोन्ही मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या स्वकष्टार्जित मिळकती आहे व त्या वाटपासाठी पात्र नाहीत व दावा मिळकत १(अ) मध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांचे ५० वर्षापासूनचे घर व प्रतिवादी क्र.१ व २ हे दावा मिळकत १(अ) विक्री करणार नाही अथवा वित्तीय संस्थेत कर्ज काढणार नाही, अशी पुरशिस देखील अंडरटेकिंग स्वरुपात नि.क्र.४४ अन्वये प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिलेले आहे व त्यामुळे मनाई सारखी दाद वादीच्या लाभात मंजूर करता येणार नाही.

15) प्रतिवादी क्र.१ व २ यांनी खालील न्यायनिर्णयावर या न्यायालयाचे लक्ष वेधले.

16) <u>मेजरसिंग वि. परमजीतसिंग एआयआर २०१९ पंजाब व हरियाणा १६७</u>

सदर न्यानिर्णयामध्ये आदरणीय, पंजाव व हरियाणा उच्च न्यायालय यांनी विशिष्ट दिलासा अधिनियम १९६३ चे कलम ३८ चे तरतुदी लक्षात घेऊन असे म्हणले की, जेव्हा निव्वळ मनाईकरिता दावा दाखल केलेला असतो व प्रतिवादीने काही क्षेत्र खरेदीकरुन घेतले असेल व प्रतिवादी स्वतंत्ररित्या ते उपभोगत असेल तर जोपर्यंत वाटपाचा दावा दाखल होत नाही तोपर्यंत बांधकाम करण्याच्या बाबतीत निरंतर ताकीदीची दाद मंजूर करता येणार नाही. जोपर्यंत वाटपाचा दावा दाखल करता येणार नाही.

17) <u>**के.माधवराज नायक वि. के श्रीधर नायक एआयआर २००९ (एनओसी) २८८४ (कर्नाटका)**</u> सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय उच्च न्यायालय, कर्नाटक हिंदू कायद्यातील वडिलार्जित मिळकत (ancestral property) ही संकल्पना विचारात घेऊन असे म्हटले की, जी मिळकत एखाद्या पुरूषाने त्याचे वडील अथवा वडीलांचे वडील अथवा वडीलांच्या वडीलांचे वडील यांच्याकडून मिळविली असेल व ज्या मिळकतीमध्ये मुलाला अथवा मुलाच्या मुलाला जन्मापासून हिस्सा येत असेल अशी मिळकत ही वडिलार्जित मिळकत असते व जोपर्यंत हे दाखवून दिले जात नाही की, एखादी मिळकत ही वडिलार्जित मिळकतीच्या उत्पन्नाच्या आधारे खरेदी केलेली मिळकत आहे. तोपर्यंत ती मिळकत ही वाटपास पात्र आहे असे म्हणता येणार नाही.

18) <u>**दादा भगवान शिंदे वि. तुळसाबाई नारायण शिंदे २००८– ३ एमएचएलजे**</u>

**पान क्र.३७५** सदर न्यायनिर्णयामध्ये आदणीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी महाराष्ट्र जमिन महसूल कायदा १९६६ चे कलम १५७ च्या तरतुदी विचारात घेऊन असे म्हटले आहे की, फेरफारावरून एखाद्याचे मालकी हक्क संपुष्टात येत नाही अथवा नव्याने तयार होत नाही.

19) **प्रेमजी रतन शहा वि. भारत सरकार १९९५ (एआयआर) एससीडब्ल्यू २४२५** सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी विशिष्ट दिलासा अधिनियम १९६३ चे कलम ४१ (जे) विचारात घेऊन असे म्हटले की, मनाईसारखी दाद ही हक्काच्या स्वरुपात मागू शकत नाही व न्यायालयाला ती योग्य वाटली तरच न्यायालय ती मंजूर करु शकते व जी व्यक्ती बेकायदेशीर कब्जेमध्ये आहे अथवा घुसखोरी करुन दावा मिळकतीच्या ताब्यात आहे ती व्यक्ती मुळ मालकाविरुद्ध (true owner) मनाईसारखी दाद मागू शकत नाही.

20) प्रस्तुतच्या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांनी केवळ वादी हेच कब्जामध्ये आहेत अथवा घुसखोरी करुन कब्जामध्ये शिरले आहेत अथवा बेकायदेशीररित्या दावा मिळकतीच्या ताब्यात आहेत, असा बचाव घेतलेला नाही. याउलट प्रतिवादी क्र.१ व २ दावा मिळकतींचा कब्जा आहे असे कथन करतात व मुळ मालक वादी आहेत असे ते स्पष्टरित्या मान्य करत नाहीत त्यामुळे **प्रेमजी रतनसे शहा** या न्यानिर्णयाचे प्रमाणाचा आदर राखून त्याचे प्रमाण प्रतिवादी क्र.१ व २ ला

उपयोगी पडत नाही. प्रस्तुतचा दावा हा केवळ निरंतर ताकीदीचा दावा नाही व प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वादींनी वाटप मागितलेले आहे, त्यामुळे **मेजरसिंग** या न्यानिर्णयाचे प्रमाणाचा आदर राखून त्याचे प्रमाण प्रतिवादी क्र.१ व २ ला उपयोगी पडत नाही. तसेच, **के. माधवराज नायक व दादा भगवान शिंदे** या न्यायनिर्णयातील प्रमाणाचे अवलोकन केले, परंतु, त्या न्यायनिर्णयातील परिस्थिती वेगळी होती, त्यामुळे, त्या न्यानिर्णयांचे प्रमाणाचा आदर राखून त्यांचे प्रमाण प्रतिवादी क्र.१ व २ ला उपयोगी पडत नाही.

21) परंतु दाव्यामध्ये वादीने रंजना रेडेकर यांना सामील केलेले नाही. तसेच वादीने स्पष्टपणे असे मान्य केलेले नाही की, रंजना ही दुसरी पत्नी आहे व तिच्यापासून झालेली वादी क्र.१ व २ ही अपत्ये आहेत. वादींनी दाव्यामध्ये वंशावळ देखील दिलेली नाही. या ही पलीकडे प्रथमदर्शनी असे दिसून येते की, दावा मिळकत १(ब) वरती श्री. भवानीमाता नागरी पतसंस्था मर्या. यांचे कर्ज होते व संबंधित खरेदीखत हे दि.२८/०६/२०१६ ला प्रतिवादी क्र.१ ने करुन घेतले आहे व इतक्या वर्षामध्ये वादींनी त्याविरुद्ध आक्षेप का घेतला नाही, असा देखील प्रथमदर्शनी प्रश्न निर्माण होतो. एखाद्या मिळकतीवर कर्ज असेल तर ती मिळकत कायदेशीर देणे भागविण्यासाठी कुटूंबातील कर्ता त्याची विक्री करु शकतो. प्रथमदर्शनी सदर मिळकतीवर त्यावेळी कर्ज होते व ते कर्ज फेडण्यासाठी चंदर रेडेकर यांनी ती

मिळकत विकली व दस्तामध्ये सदर कर्ज भागविण्यासाठी मिळकत विकली आहे असा उल्लेख आहे, परंतु, दावा मिळकत १(क) बाबतीत कोणतेही कर्ज असल्याचे त्यामध्ये दिसून येत नाही. थोडकयात दावा मिळकत १(ब) पुरते प्रथमदर्शनी असे दिसून येते की, ती मिळकत कर्जापोटी विक्री केली आहे.

22) वादींनी नि.क्र.४१ च्या अनुषंगाने अनेक कागदपत्रे दाखल केली आहेत, परंतु, त्याचा योग्य उल्लेख दाव्यामध्ये केलेला नाही. या ही पलीकडे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कैफियतीमध्ये असा आक्षेप नोंदविला आहे की, यापूर्वी रे.क.नं.६३/१९८९ चा दावा हा वादींची आई रंजना रेडेकर यांनी प्रस्तुतच्या दाव्यातील प्रतिवादी क्र.२ सुशिला यांचेविरुद्ध दाखल केला होता व तो दावा हा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला होता व त्याचा उल्लेख दाव्यात कोठेही केलेला नाही. या ही पलीकडे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी स्पष्टपणे कैफियतीमध्ये असा उल्लेख केला आहे की, दावा मिळकत १ अ मध्ये घराचा उल्लेख आहे व वादींनी देखील त्यांच्या दाव्यामध्ये दावा मिळकतीमध्ये असलेल्या घरामध्ये व उर्वरित जागेमध्ये वहिवाटीला प्रतिवादी हरकत अडथळा करतात असे कथन दाव्याचे परिच्छेद ४ मध्ये केले आहे. यावरून दावा मिळकत १ अ मध्ये घरे आहेत ही बाब वादामध्ये नाही व संपूर्ण गटाचे(दावा मिळकत १अ) वाटप वादी मागत आहेत.

23) प्रतिवादी क्र.१ व २ यांनी असे देखील कथन केले आहे की,

ग्रामपंचायत मिळकत ३३७ ही दावा मिळकत १ अ मध्ये समाविष्ट आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नि.क्र.३६ अन्वये रे.क्र.६३/१९८९ चे न्यायनिर्णयाची प्रत दाखल केली आहे. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले त्यामध्ये रंजना रेडेकर यांनी प्रस्तुतच्या दाव्यातील प्रतिवादी क्र.२ विरुद्ध निरंतर ताकीदीची दाद ग्रा.पं.मि.नं.३३७ बाबत मागितली होती व त्या न्यानिर्णयामध्ये न्यायालयाने रंजना या संबंधित मिळकतीच्या कब्जेवहिवाटीत नाहीत व सुशिला (प्रस्तुतच्या दाव्यातील प्रतिवादी क्र. २) या संबंधित मिळकतीच्या कब्जामध्ये आहेत, असा निष्कर्ष नोंदविला व प्रतिवादी क्र.१ व २ यांनी देखील ग्रा.पं.मि.नं.३३७ मध्ये घर आहे व ती मिळकत तेच वहिवाटतात व वादीशी त्यांचा कोणताही संबंध नाही, असे कथन केले आहे. अशा परिस्थितीमध्ये वादींनी संबंधित बाब न्यायालयापासून लपविली आहे, याबद्दल न्यायालयाच्या मनात कोणतीही शंका नाही. सदरची बाब ही महत्वाची आहे, कारण, दावा मिळकती १(अ) चे भागामध्ये संबंधित घर येत आहे व वादी असे कथन करतात की, दावा मिळकतमध्ये असणा-या घरांमध्ये देखील प्रतिवादी हरकत अडथळा करत आहेत, असे कथन करतात.

24) मनाईसारखी दाद मागताना स्वच्छ हाताने न्यायालयापुढे येणे आवश्यक आहे. वादींना "One who seeks equity has to do equity" या तत्वाची बाधा येते. या न्यायालयाने गुणदोषावर दोन्ही बाजूंचे ऐकले. जेव्हा एखादा

पक्षकार हा स्वच्छ हाताने न्यायालयापुढे येत नसेल तर न्यायालयाने त्याचा अर्ज गुणदोषावर ऐकण्याची आवश्कयता नाही व तो अर्ज त्वरित फेटाळला पाहिजे, असे मत आदरणीय, सर्वोच्च न्यायालय यांनी पुढील न्यायनिर्णयात नोंदविले आहे. सदर कामी मी पुढील न्यायनिर्णयाचा आधार घेतो.

25) **<u>Amar Singh Vs. Union of India 2011 AIR SCW 3297</u>** wherein the Hon'ble Apex Court has held that it is the duty of party seeking an relief of injunction to bring under the notice to the Court all the material facts for determining his right and it is no excuse for him to say that he was not aware of the importance of any fact which he has committed to bring forward, because, Courts have over the centuries, frowned upon litigants who, with intend to deceive and mislead the Courts, initiated the proceeding without full disclosure of facts. Such litigants are not entitled to be heard on merits of their case

26) मनाईसारखी दाद मागितली असेल त्यावेळेस पक्षकाराचे वर्तन देखील हे स्वच्छ व प्रामाणिक असले पाहिजे, असे मत आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी नोंदविले आहे. सदर कामी मी पुढील न्यानिर्णयाचा आधार घेतो.

27) **<u>M/s. Gujarat Pottling Co. Ltd. Vs. the Coca Cola Co. & Ors. AIR 1995 SC 2372</u>** wherein the Hon'ble Apex Court has held that, while considering the application of temporary injunction Court is also expected to look the conduct of the party invoking the jurisdiction of the Court and Court may refuse to interfere unless the parties conduct is free from blame. Since, the relief is equitable in nature and the party of

invoking the jurisdiction of the Court has to show that he was having no fault and his conduct was fare and honest.

28) वादींचे वर्तन पाहता ते स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आलेले नाहीत, कारण, दाव्यातील परिच्छंद ४ मध्ये दावा मिळकतींमध्ये घर असल्याचे वादी मान्य करतात व त्याबाबत म्हणजे ग्रा.पं.मि.नं.३३७ मध्ये प्रस्तुतच्या प्रतिवादी क्र.२ चा कब्जा आहे असा निष्कर्ष रे.क.नं.६३/१९८९ मध्ये न्यायालयाने काढला असून सदरील बाब ही अत्यंत महत्वपूर्ण आहे व त्याबाबत वादींनी कोणतेही कथन दाव्यामध्ये केलेले नाही व ती बाब न्यायालयापासून लपविली आहे. त्यामुळे वादी हे न्यायालयापुढे स्वच्छ हाताने आले नसल्याने प्रथमदर्शनी केस ही वादींच्या बाजूने नाही व न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूने नाही व अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कशानेही न भरून येणारे नुकसान होईल, असे वाटते. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देतो. तसेच जरी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नि.क्र.४४ अन्वये अशी पुरशिस दिली आहे की, दावा मिळकत १(अ) हे ते विक्री करणार नाहीत अथवा अन्य वित्तीय संस्थेचा कर्जबोजा त्यावर निर्माण करणार नाहीत, परंतु, सदर अंडरटेकिंगचा भंग केल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई त्यांच्यावर होऊ शकते, परंतु, केवळ तेवढे अंडरटेकिंग दिले म्हणून वादीचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज अन्य मिळकतींबरोबर दावा मिळकत १(अ) साठी पण मंजूर करायलाच पाहिजे असा तर्क

लावता येणार नाही. सबब, मुद्दा क्र.४ करीता मी खालील आदेश पारित करतो.

| **<u>आ दे श</u>** |
|---|
| अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2026.05.02 18:16:28 +0530

**गारगोटी** **(नि. दि. रुद्रभटे)**

दि.– ०२/०५/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर गारगोटी